● गुरुवार, दि. २ जानेवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १५५ वा ● किमंत २ रु. ● पा१.ने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल ॲण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ MAHMAR/2013/50827

# स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यकर्त्यांना मानाचा फेटा बांधणार - आ. अर्जुनराव खोतकर

## नागरी सत्कार सोहळ्यास लोटला जनसागर; मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह मान्यवरांकडून आ. खोतकरांना वाढदिवसाच्या शुभेच्छा







### आ. खोतकर यांना अफाट ताकद - आ. उढाण

आ. अर्जुनराव खोतकर आणि मी एकाच शाळेत शिकत होतो मी अभ्यास करत होतो आणि आ. खोतकर हे समाजाचा अभ्यास करत होते. नंतर कळाले त्यांचा सामाजिक अभ्यास प्रचंड आहे. ४० वर्षे राजकारणात टिकून असलेल्या आ. खोतकर यांच्या पाठीशी जनतेची अफाट ताकद आहे असे आ. हिकमत उढाण यांनी याप्रसंगी सांगितले. आपल्याला राजकारणाच्या सुरुवातीच्या काळात आ. खोतकर यांनीच आग्रह धरून उमेदवारी दिली होती. अशी आठवण करून देत घनसावंगीत रस्ते, ऊस आणि सिंचनाचा प्रश्न सोडविणार असून पाचही आमदार असतांना जिल्ह्यात मंत्री नसल्याबद्दल आ. हिकमत उढाण यांनी खंत व्यक्त केली. यापूर्वी बाहेरच्या पालकमंत्र्यांचा अनुभव बरोबर नाही. तेव्हा आता बाहेरचा पालकमंत्री देऊ नये कारण त्यांना इथल्या मातीशी देणे घेणे नाही अशी टिप्पणी आ. उढाण यांनी केली.

### वॉटर ग्रिड योजना पूर्ण करावी - घुगे

तीस वर्षानंतर पुन्हा जिल्ह्याला विकासाची संधी मिळाली आहे आ.अर्जुनराव खोतकर यांच्या नेतृत्वाखाली शासनाकडे आपण जालना आणि बदनापूर तालुक्यांसाठी वॉटर ग्रीड योजनेसाठी पाठपुरावा केला. आ. खोतकर यांच्या प्रयत्नांमुळे त्यास अंशतः मंजुरी मिळाली आहे. सदर योजना लवकर सुरू करावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी केली. आ.खोतकर यांना पुढील काळात मंत्रीपद मिळेल असे वचन मुख्यमंत्र्यांनी दिले असून कार्यकर्त्यांच्या इच्छा पूर्ण होतील. असा विश्वासही भाऊसाहेब घुगे यांनी व्यक्त केला.

**जालना । प्रतिनिधी -** आमच्या निवडणुका संपल्या, केंद्र आणि राज्यात महायुतीची सत्ता आहे. आता महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असून यासाठी आपण गावागावात जाऊन वणवण फिरणार आहोत कार्यकर्त्यांना निवडून आणत मानाचा फेटा बांधणार असल्याचा दृढ निर्धार शिवसेना उपनेते, आ. अर्जुनराव खोतकर यांनी आज व्यक्त केला.

भाग्यनगर परिसरातील दर्शना निवासस्थानासमोर शिवसेना जालना जिल्ह्याच्या वतीने आ. अर्जुनराव खोतकर यांचे अघभिष्टचिंतन, नागरी सत्कार सोहळा बुधवारी ( ता. ०१) जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सत्कार उत्तर देतांना आ.खोतकर बोलत होते. यावेळी आ. हिकमत उढाण, माजी आ.अरविंदराव चव्हाण, रिपाइं चे मराठवाडा अध्यक्ष ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, भाजपाचे प्रदेश निमंत्रित सदस्य राजेश राऊत, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, पंडितराव भुतेकर, ॲड. सुनील किनगांवकर, फेरोजलाला तांबोळी, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहर प्रमुख विष्णू पाचफुले, आत्मानंद भक्त, संतोष मोहिते, गणेश सुपारकर, भगवान अंभोरे, युवा सेना जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर, अजय कदम, गणेश मोहिते, राहुल गवारे, रवींद्र ढगे, ॲड. भास्कर मगरे, शेख जावेद, संध्याताई देठे, कालिंदा ढगे, मेघराज चौधरी, दिनेश भगत, कमलेश खरे, योगेश रत्नपारखे, दीपक वैद्य, जफर खान आदींची उपस्थिती होती.

सत्कारास उत्तर देतांना



आ. अर्जुनराव खोतकर म्हणाले, या कारकिर्दीत सर्वोत्तम कामगिरीची हमी आपण दिली असून सर्व आश्वासने पाळण्याचा प्रयत्न करतोय .गावाच्या विकासासाठी तल्लख, कुशाग्र बुद्धीचे कार्यकर्ते आपल्याला आवडतात असे नमूद करत आ.हिकमत उढाण यांच्याकडे प्रशासनाचा अनुभव असून आमच्या दोघांच्या अनुभवांतून जालना आणि घनसावंगीला थेट जायकवाडीतून वॉटर ग्रीड चे पाणी मिळवून देणार असल्याचा संकल्प आ. खोतकर यांनी याप्रसंगी व्यक्त केला.जालना शहरात आपण विकासाच्या कामांसाठी ६८ कोटी रुपयांचा निधी आणला असून विकासाचा गाडा पुढे नेण्यासाठी महानगरपालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेण्याकरिता सर्व घटक पक्षांना सोबत घेऊन मिळून-मिसळून काम करण्याची आमची तयारी आहे तथापि राजेश राऊत यांना निर्देश करत तुम्ही तुमच्या नेतृत्वाला कळवा असे आ.खोतकर यांनी सूचविले.

यावेळी ॲड. ब्रम्हानंद चव्हाण , राजेश राऊत ,जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, पंडितराव भुतेकर, ॲड. सुनील किनगांवकर, विष्णू पाचफुले, संध्याताई देठे, कालिंदा ढगे यांची भाषणे झाली. सुत्रसंचालन इंजि. शुभम टेकाळे यांनी केले तर किरण शिरसाठ यांनी आभार मानले.

सोहळ्यास महायुतीचे पदाधिकारी, महिला, युवक, आ.अर्जुनराव खोतकर यांच्या चाहत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह मान्यवरांकडून शुभेच्छा!**

शिवसेना उपनेते ,आ. अर्जुनराव खोतकर यांच्या वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, आ.बबनराव लोणीकर, आ. नारायण कुचे, आ.संतोष दानवे, माजी मंत्री राजेश टोपे६, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांच्यासह मंत्रिमंडळातील मंत्री, महायुतीचे आमदार, उद्योजक, व्यापारी, प्रशासनातील अधिकारी, सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आ. खोतकर यांना भेटून तसेच भ्रमणध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. दर्शना निवासस्थानी दिवसभर शुभेच्छा देण्याकरता वर्दळ होती.

**मोठ्या मनाचे व्यक्तीमत्व -९८, माजी आ. चव्हाण**

पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी मराठवाड्यात आणण्याचा संकल्प आ.अर्जुनराव खोतकर यांनी दोन दिवसापूर्वीच केला असून सामान्य कार्यकर्त्यांना जपणारे आ.अर्जुनराव खोतकर हे मोठ्या मनाचे व्यक्तिमत्त्व आहे. असे गौरवौद्गार माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरविंदराव चव्हाण यांनी याप्रसंगी काढले. जिल्ह्यात महायुतीच्या आमदारांची मजबूत टीम झाली असल्याने विकासाला गती मिळेल आणि जनतेच्या अपेक्षांची पूर्ती होईल असा विश्वास व्यक्त करत सामान्य कार्यकर्ता हीच महायुतीची ताकद असल्याचे अरविंदराव चव्हाण यांनी याप्रसंगी सांगितले.

# अमेरिकेत दहशतवादी हल्ला

## ट्रकने चिरडून केला गोळीबार; १२ जणांचा मृत्यू

**नवी दिल्ली -** अमेरिकेच्या न्यू ऑर्लियन्स शहरात भयंकर हल्ला झाला असून, यामध्ये किमान १२ जणांचा मृत्यू आणि ३० लोक जखमी झाले आहेत. हल्लेखोराने न्यू ऑर्लिन्समधील बोर्बन स्ट्रीटवर गर्दीत ट्रक घुसवला व नंतर वाहनातून बाहेर पडून गोळीबार करू लागला. याबाबत न्यू ऑर्लियन्स शहर पोलिसांनी माहिती दिली आहे.

या घटनेबाबत अधिक माहिती अशी की, अमेरिकेतील न्यू ऑर्लियन्स शहरातील बोर्बन स्ट्रीटवरील गर्दीत हल्लेखोराने ट्रक घुसवला. यामध्ये वाहनाखाली चिरडले गेलेल्या १२ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर हल्लेखोराने वाहनातून बाहेर पडत गोळीबार करायला सुरूवात केली. या घटनेमध्ये जखमी झालेल्यांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. यासह या हल्ल्यात दोन पोलीस अधिकारीही जखमी झाले आहेत.

या घटनेवर प्रतिक्रिया देताना न्यू ऑर्लीन्सचे महापौर लाटोया कॅंट्रेल यांनी हा दहशतवादी हल्ला असल्याचे म्हटले आहे. पण, बुधवारी पहाटे ट्रक गर्दीत घुसला तेव्हा नेमकं काय घडले याचा तपास एफबीआयने सुरू केला आहे. बीबीसीच्या वृत्तानुसार, सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या अनेक व्हिडिओमध्ये जमिनीवर अनेक लोक गंभीर जखमी झाल्याचे दिसत आहे.

ही घटना घडल्यानंतर न्यू ऑर्लीन्स शहर आपत्कालीन विभागाने एक्सवर पोस्ट करत, कॅनल आणि बोर्बन स्ट्रीटवर मोठा अपघात घडला आहे. या परिसरापासून दूर राहा, असे म्हटले आहे.

दरम्यान न्यू ऑर्लीन्स हल्ल्यातील हल्लेखोराचा मृत्यू झाल्याचे एका पोलीस अधिकाऱ्याने **पान २ वर**

# व्यापाऱ्यास मारहाण करुन लुटणारा सहावा आरोपी जेरबंद

## रोख रकमेसह नकली पिस्टल; मोटारसायकल व दोन मोबाईल जप्त

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील जुना मोंढा भागात व्यापाऱ्यास मारहाण करून लुटणारा सहावा आरोपी पोलिसांनी जेरबंद केला आहे. यश विजय देशमुख वय २० वर्ष असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, दिनांक २७/१२/२०२४ रोजी २१:१५ वाजेच्या सुमारास पाच अज्ञात आरोपीतांनी फिर्यादी नामे घनशाम भगतराम अग्रवाल वय ६० वर्ष रा संभाजीनगर जालना यांना जुना मोंढा परीसरातील गुरुमुख होजीयरी कापड दुकानाच्या समोरील गल्लीमध्ये मारहाण करुन त्यांच्या ताब्यातील रुपये १२,५०,००० हिसकावून घेवुन गेल्याची घटना घडल्याने फियादी यांचे फिर्यादीवरुन सदर बाजार पोलीस ठाणे जालना येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याअनुशंघाने मा. पोलीस अधिक्षक बन्सल साहेब यांनी घटनास्थळी भेट देवून गुन्हा उघडकीस आणणे बाबत. पोलीस निरीक्षक पंकज जाधव व पोलीस निरीक्षक संदीप भारती पोलीस ठाणे सदर बाजार यांना सुचना दिल्या होत्या त्याअनुशंघाने स्थानिक गुन्हे शाखा व सदर बाजार जालना यांची पथके नेमुण अज्ञात आरोपीतांचा शोध घेत आसतांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की सदरची चोरी ही मानदेवुळगाव ता बदनापुर जि जालना येथील गोपाल गणेस गायकावाड व सुनिल माहादु पवार यांनी त्यांचे साथीदाराच्या मदतीने केली आसल्याची माहीती मिळाली आहे.

दिनांक २९/१२/२०२४ रोजी तांत्रिक विश्लेषन व गोपनीय माहीतीच्या आधारे गुन्हयातील आरोपी नामे १) गोपाल गणेस गायकाबाड रा मानदेवुळगाव २) सुनिल माहादु पवार रा मानदेवुळगाव ३) कैलास ऊर्फ कॉलेज राजु गायकाबाड रा कैकाडी मोहल्ला जालना ४) सचिन ऊर्फ पोच्छाऊर्फ माया हरीचंद्र जाधव रा कैकाडी मोहल्ला जालना ५) सुमित ऊर्फ ओम शैलेश डुरे रा शिषटेकडी कसबा जुना जालना यांना **पान २ वर**



# संपादकीय

पान

## चिंताजनक विमान दुर्घटना

दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान रविवारी मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले. या अपघाताने संपूर्ण जगात हळहळ व्यक्त करण्यात आली. विमान अपघात घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा जीव गेल्याची ही जगातील पहिलीच घटना नाही. या आधीही विमान अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षीच म्हणजे २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहारांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. कोरियात झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे मात्र विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाल्यानंतरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. मागील वर्षी नेपाळमध्ये झालेला विमान अपघात हा खराब हवामानामुळे झाला होता. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. काही वेळा पक्षाची धडक बसल्याने विमान अपघात झाल्याचे सांगण्यात येते. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा यात जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजार १६४ विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. भारतातही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या घटना वाढल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने सुदैवाने अपघात टळला होता. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता. त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्या विमानाचा अपघात झाला नाही मात्र आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमावावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. संजय गांधी, माधवराव सिंधिया, जी एम सी बालयोगी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. दोन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यम वर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# शहरातील सर सय्यद अहमद खान उर्दु प्राथमिक शाळेतील ज्येष्ठ शिक्षक मोहम्मद युनूस यांचा निवृत्ती सत्कार सोहळा संपन्न

शहरातील सर सय्यद अहमद खान उर्दु प्राथमिक शाळेतील ज्येष्ठ शिक्षक मोहम्मद युनूस सर यांचा निवृत्ती सत्कार सोहळा संपन्न..

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील सर सय्यद अहमद खान उर्दु प्राथमिक शाळेत आज दि.३१ मंगळवार रोजी दुपारी दोन वा. च्या सुमारास एका भावनिक आणि सन्मानीय वातावरणात निवृत्ती सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात शाळेतील ज्येष्ठ शिक्षक मोहम्मद युनूस सर यांना त्यांच्या ३२ वर्षांच्या समर्पित सेवेसाठी सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मोहम्मद इकबाल कुरेशी साहेब(अध्यक्ष सर सय्यद अहमद खान एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी)मुख्य अतिथी म्हणून अब्दुल खुदुस (सेक्रेटरी सर सय्यद अहमद खान एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी) . प्रमुख पाहुण्यांनी मोहम्मद युनूस सर यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचे कौतुक करताना त्यांच्या विद्यार्थ्यांसाठीच्या तळमळीची विशेष नोंद घेतली.

शाळेच्या मुख्याध्यापक अन्सारी मतिन सर यांनी आपल्या भाषणात म्हटले, मोहम्मद युनूस सर हे शाळेच्या यशस्वी वाटचालीचे एक महत्त्वाचे आधारस्तंभ होते. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शेकडो विद्यार्थ्यांचे भविष्य उज्ज्वल झाले आहे.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी वा शिक्षणी श्री. मोहम्मद युनूस सर यांच्यासाठी विशेष भाषणं आणि गायन सादर केले. त्यांच्या सहकाऱ्यांनी आठवणींना उजाळा देत भावनिक शब्दांत त्यांचे आभार मानले.



श्री. मोहम्मद युनूस सर यांनी आपल्या उत्तरपर भाषणात शाळेतील प्रत्येक व्यक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली आणि विद्यार्थ्यांना प्रामाणिकपणे शिक्षण घेण्याचा सल्ला दिला. ही शाळा म्हणजे माझे दुसरे घर होते. मी येथे घालवलेले दिवस आयुष्यभर लक्षात राहतील, असे ते म्हणाले. शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी त्यांच्या निवृत्तीला निरोप देताना डोळ्यांत पाणी आणले.

कार्यक्रम चे सूत्रसंचालन श्री नसीर अहमद सर यांनी केले या कार्यक्रमास शिक्षक व शिक्षिका उपसथित होते शेवटी गय्युर सुभानी यांनी आभार मानले.

# शिक्षणमहर्षी माजी आ. प्रा. धोंडीरामजी राठोड यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन

**मंठा । प्रतिनिधी -** विधान परिषदचे माजी आमदार तथा मराठवाडा शिक्षणमहर्षी प्राचार्य धोंडीरामजी राठोड यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त मंठा शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात माजी आमदार धोंडीरामजी राठोड यांच्या जन्मदिनाच्या औचित्य साधुन दिनांक ३ जानेवारी शुक्रवार रोजी नामांकित डॉक्टरांकडून मोफत आरोग्य तपासणी व आवश्यक्य असल्यास मोफत शस्त्रक्रियाचे शिबिर सकाळी १० ते ५ यावेळत मंठा येथील जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ मैदान तहसील रोड येथे आयोजित करण्यात आले आहे.तसेच(ता.३) शुक्रवार रोजी दुपारी १२ वा. प्रख्यात कवी प्रा. फ.मु.शिंदे,डॉ संजीवनी तळेगावकर, नारायण पुरी,अरुण पवार,भरत दौंडकर यांची काव्य मैफिल रंगणार आहे.तर दुपारी २ वा. मा.आ. धोंडीरामजी राठोड यांचे अभिष्टचिंतन सोहळा व जननायक गौरव ग्रंथाचे मान्यवरांच्या उपस्थितीत प्रकाशन करण्यात येणार आहे.तर ४ जानेवारी शनिवार रोजी रात्री रात्री ७:३० वा. प्रख्यात कीर्तनकार रामायणाचार्य भागवताचार्य ह.भ.प.श्री समाधान महाराज शर्मा यांच्या अमृतवाणीतून हरी कीर्तनाच्या आयोजन करण्यात आले आहे.तरी परिसरातील नागरिकांनी मोफत आरोग्य शिबिर,कवी मफिल, व हरी कीर्तनाचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार राजेश राठोड व संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.



# माजी राज्यमंत्री अर्जुन खोतकर यांचा सत्कार



**जालना -** महाराष्ट्र शासन पुरस्कृत उद्योजकता विकासाचे प्रशिक्षण देणारी संस्था मिटकॉन तर्फे सन्माननीय अर्जुन भाऊ खोतकर यांचा वाढदिवसानिमित्ताने मिटकॉनचे जिल्हा प्रकल्प अधिकारी के डी दांडगे यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील आयुष्यासाठी, कार्यासाठी त्यांना भरभरून हार्दिक शुभेच्छा दिल्या.या वेळी प्रथमेश दांडगे व इतरांची उपस्थिती होती.

### मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांना नागरिकांचे निवेदन

# छत्रपती संभाजी महाराज चौकातील अतिक्रमण हटवण्यासाठी मागणी

**मंठा । प्रतिनिधी -** शहरातील विडोळी फाटा परिसरात व्यवसायकांनी रस्त्यालगत हातगाडे,दुकानें मांडून अतिक्रमण केले आहे. या अतिक्रमाणामुळे शाळकरी विद्यार्थ्यांसह नागरिकांना रहदारीस अडथळा निर्माण होत आहे.सदरील अतिक्रमण तात्काळ काढून राहादारीस रस्ता खुला करून द्या अशी मागणी तालुक्यातील नागरिकांनी मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांकडे निवेदणाद्वारे केली आहे

निवेदनात नमुद केले की, मंठा तालुक्यातील रहिवाशी असून मंठा-विडोळी चौफुली परिसरात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले आहेत सदर ठिकाणी देशी दारुच्या व मटनाच्या दुकाने आहे. दारुड्यामुळे शाळेत येणाऱ्या मुलींना व कामासाठी येणाऱ्या स्त्रीयांना अडथळा निर्माण होत आहे. शेतकऱ्यांना शहरात शेती माल विक्रीसाठी वाहने व बैलगाडी ने आण करतांना दारुड्यांसोबत वाद होत आहेत तसेच अपघात देखील होत आहेत. याचा विचार करुन मंठा-विडोळी चौफुली परिसरातील अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावेत, नसता आपल्या कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येईल असा ईशारा निवेदनाच्या शेवटी देण्यात आला आहे निवेदनावर परिसरातील नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पाणीपट्टी सरसगट माफ करण्याची मागणी मान्य; आमरण उपोषण तात्पुरते स्थगित - बोरशे गुरुजी




**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** आम आदमी पार्टीच्या कार्यकर्ते फारुक शेख तसेच स्वराज्य पक्षाचे कार्यकर्ते विकास जाधव यांचे भोकरदन नगरपरिषदे समोर आमरण उपोषण दिनांक ३० डिसेंबर २०२४ पासून सुरु होते.

उपोषणकर्त्यांच्या मागण्या लेखी स्वरूपामध्ये नगरपरिषदे मार्फत मान्य करण्यात आल्यामुळे व त्याबाबतचा प्रस्ताव माननीय जिल्हाधिकारी जिल्हा जालना यांच्याकडे मंजुरीसाठी २० जानेवारी २०२५ च्या आत पाठवण्याचे मान्य केल्यामुळे अमरण उपोषण मागे घेण्यात आले. पत्रात पुढे म्हटले आहे की -

मागील पाच वर्षातील पाणीपट्टी नागरिकांना माफ करण्यासाठीचा प्रस्ताव शासनाकडे २० जानेवारी २०२५ पर्यंत पाठवण्यात येईल.उद्धट वर्तणूक करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात येईल. शहराला स्वच्छ आणि निर्जंतुकीकरण केलेले पाणी एक दिवस आड देण्यासाठी लागणारा खर्चासाठी पाईपलाईन दुरुस्ती व इतर खर्च अंदाजे ६६ लाखाचे प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी पाठवण्याचे मान्य करण्यात आले. तसेच ज्या ठिकाणी पाईपलाईन फुटून नळाला घाणेरडे पाणी येते ते तात्पुरते दुरुस्ती करून स्वच्छ पाणी पुरवठा होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील इत्यादी मागण्या मान्य केल्यामुळे आमरण उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी परसराम जाधव, फिरोज भाई,जुनेद भाई हाजीभाई आम आदमी पार्टीचे तालुका अध्यक्ष जनार्दन पाटील सोळुंके आम आदमी पार्टीचे जालना जिल्हा उपाध्यक्ष बोरसे गुरुजी हजर होते. नगर परिषदेचे कार्यालयीन अधीक्षक गाडेकर साहेब पाणीपुरवठा इंजिनियर श्री व्यवहारे साहेब यांच्या हस्ते उपोषण सोडण्यात आले.

# घरात कुणी नसल्याची संधी साधून चोरट्याने ६८ हजारांचे सोन्याचे दागीने केले लंपास

### शहरातील हनुमान घाट येथील घटना

जालना । प्रतिनिधी - येथील अक्षय सुशिल टेकुर, वय २५ वर्ष, व्यवसाय खाजगी नोकरी, रा. हनुमान घाट, भगतसिंग चौक जालना हे त्यांच्या परिवारासह घराला कडी कोंडा व कुलुप लावुन मुंबई येथे त्यांचे नातेवाईकांचे वास्तुशांती कार्यक्रमात गेले असता २६ डिसेंबर ते ३० डिसेंबर च्या दरम्यान कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचे मेन दरवाजाचे कडी कोंडा व कुलुप तोडुन घरात प्रवेश करुन घरातील कपाट मध्ये ठेवलेले चाळीस हजार रू. किंमतीचे सोन्याचे झुमके,वीस हजार रू. किंमतीचे सोन्याचे टाप्स,आठ हजार रू.किंमतीची सोन्याची आंगठी, असे एकुण ६८ हजार रु.किंमतीचे सोन्याचे दागीने चोरुन घेवुन गेला म्हणून अक्षय टेकुर यांच्या फिर्यादीवरून दि.३० सोमवार रोजी सकाळी साडे अकरा वा.कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ भारतीय न्याय संहिता नुसार सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पुढील तपास सदर बाजार पोलीस ठाण्याचे कॉन्स्टेबल वाघमारे हे करत आहेत.

# टेंभुर्णीमधील तिघांची कबड्डी स्पर्धेसाठी निवड




**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील तीन कबड्डीपटू राज्यस्तरीय कबड्डी अजिंक्य निवड चाचणीसाठी पात्र ठरले आहे. सांगली येथे होणाऱ्या ५१ व्या राज्यस्तरीय कुमार गट कबड्डी अजिंक्य निवड चाचणीत आता या खेळाडूंना खेळण्याची संधी मिळणार आहे. पात्र खेळाडूंमध्ये कृष्णा ओमराजू उखर्डे, उदय दयानंद साळवे व धीरज नंदू शेळके यांचा समावेश आहे. हे तिघे खेळाडू आता छत्रपती संभाजीनगर विभागीय संघात जालना जिल्ह्यातर्फे खेळणार आहे. यात संघ कर्णधारपदी कृष्णा उखर्डे याची निवड झाली आहे. यापूर्वीही कृष्णाने राज्यस्तरीय संघामध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व केले आहे. येथील शिवशक्ती क्रीडा मंडळाचे खेळाडू असलेल्या या खेळाडूंना ही संधी मिळाल्याने त्यांचे शिवशक्ती क्रीडा मंडळाचे अध्यक्ष कृष्णा बेंद्रे, उपाध्यक्ष काशिनाथ सपकाळ, विठ्ठल सपकाळ, सोमेश मघाडे, अमोल राठोड, राजू दांडगे आदींनी कौतुक केले आहे.

पान १ वरुन

## अमेरिकेत दहशतवादी ...

सीएनएनला सांगितले. जाणूनबुजून हे कृत्य केल्याचे काही पुरवे सापडल्याचेही पोलिसांनी स्पष्ट केले आहे. एफबीआय आणि पोलीस संयुक्तपणे या हल्ल्यामागे काय हेतू आहे याचा शोध घेण्यासाठी वाहनाची तपासणी करत आहेत.

प्रत्यक्षदर्शींच्या म्हणण्यानुसार, पांढऱ्या रंगाचा ट्रकने बॅरिकेड्स तोडून फुटपाथवरील लोकांना चिरडले. या घटनेवेळी तिथे उपस्थित असलेला २२ वर्षांचा केविन गार्सिया म्हणाला की, बोर्बन फुटपाथच्या डाव्या बाजूला एक ट्रक प्रत्येकाला चिरडत असल्याचे मी पाहिले. यावेळी एक मृतदेह माझ्याकडे दिशेने उडल्याचेही मी पाहिले. यानंतर लगेचच मला आला गोळाबाराचाही आवज ऐकू आला. याबाबत सीएनएनने वृत्त दिले आहे.

## व्यापाऱ्यास मारहाण ...

त्याच्याकडुन गुन्हयातील रोख रक्कम ५,५०,०००ब सोन्याचे दागीने १,१०,००० तसेच एक गुन्हयात वापरलेली मोटार सायकल असे काढून दिले त्यानंतर सर्व आरोपी हे तपासी अधिकारी श्रीमती दिपाली शिंदे यांच्याकडे सुपुर्द करण्यात आल्यानंतर पोलीस ठाणे सदर बाजार जालना येथील पोलीस निरीक्षक भारती, पोलीस उपनिरीक्षक म्हस्के, मपोउपनि शिंदे यांनी पोलीस कस्टडी दरम्यान आरोपीतांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता गुन्हयातील आरोपी क्र ६ आरोपी नामे १) यश विजय देशमुख वय २० वर्ष व्यवसाय मजुरी रा शिषटेकडी जुना जालना याच्या मदतीने गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्याचा शोध घेवुन त्यास ताब्यात घेवुन सदर गुन्हयाबाबत विचारपुस केली असता त्यांने सदर फिर्यादी याचे बाबत संपुर्ण माहीती आरोपीतांना सांगीतल्याचे कबुल केल्याने त्यास अटक करण्यात आली. तसेच आरोपी क्र ३) कैलास ऊर्फ कॉलेज राजु गायकवाड रा कैकाडी मोहल्ला जालना ४) सचिन ऊर्फ पोच्छा ऊर्फ माया हरीचंद्र जाधव रा.कैकाडी मोहल्ला जालना ५) सुमित ऊर्फ ओम शैलेश डुरे रा. शिषटेकडी कसबा जुना जालना यांच्याकडुन गुन्हयातील उर्वरित रोख ५,९०,००० रुपये तसेच गुन्हयातील स्प्लेन्डर मोटार सायकल किमती ३५००० रुपयाची तसेच पोलीस ठाणे टेभुर्णी ता भोकरदन जि जालना येथे दाखल गुरनं २६३/२०२४ कलम ३०९ (६), ३(५) भान्यासं प्रमाणे केल्याची कबुली देवुन सदर गुन्हयात वापरलेले मोबाईल ३५००० किमती अंदाजे व फिर्यादी यास नकली असलेली ५००० रुपये किमतीची बंदुक असली असल्याचे भासवुन ती दाखवुन लुटमार केली होती. सदर बंदुक् आरोपी नामे २) सुनिल महादु पवार रा. मानदेवुळगाव यांचे राहते घरी मानदेवुळगाव ता बदनापुर येथुन जप्त करण्यात आली आहे. असा गुन्हयातील अटक आरोपीतांकडून एकुन ६,६५,००० रुपयाचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हयात आणखी एक आरोपी नामे १) यश विजय देशमुख वयं २० वर्ष व्यवसाय मजुरी अमृततुल्य चहा हॉटेल नागेवाडी जालना रा शिषटेकडी जुना जालना यास निष्पण्ण करुन त्याचा शोध घेवुन अटक करण्यात आलेली आहे.

ही कामगीरी मा. पोलीस अधिक्षक बन्सल, मा. अप्पर पोलीस अधिक्षक नोपाणी, मा.प्रो पोलीस अतिरिक्त पोलीस अधिक्षक बारवाल, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कुलकर्णी साहेब यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक संदीप भारती साहेब यांचे नेतृत्वात डी. बी. पथकाचे प्रमुख पोउपनि शैलेश म्हस्के, मपोउपनि डी डी शिंदे, पोहेकॉ राम प्रसाद रंगे, पोहेकॉ जगन्नाथ जाधव, पोहेकॉ धनाजी कावळे, पोना पटेल, पोकॉ दुर्गेश गोफणे, पोकॉ गणेश तेजनकर, पोकॉ पठाण, पोकों शेख, पोकों राहुल कटकम, चालक पोकों/ कल्पेश पाटील यांनी केली..

# हनुमान चालीसा पठण केल्याने संकटाचा नाश होतो; हनुमान शक्ती आणि बुध्दीचे देव - महेशगिरी महाराज

## भक्तमंडळीकडून १२०० चालीसाचे पठण

टेंभुर्णी । प्रतिनिधी - येथे इंग्रजी वर्षाची शेवटच्या रात्री, टेंभुर्णीच्या मध्य भागी असलेले पुरातन काळातील राम मंदिर येथे या वेळी पहिल्याच वेळी घेण्यात आलेल्या हनुमान चालीसा पठण कार्यक्रमास म ोठा प्रतिसाद भेटला असून या वेळी तरुण मुले महिला पुरुष यांनी सहभाग नोंदवित नऊ ते बारा वाजेपर्यंत संगीतमय हनुमान चालीसा पठण करत



वेगळा सामाजिक आणि भक्तीमय संदेश दिला.या कार्यक्रमा साठी गौरी आश्रम चे प्रमुख महेश गिरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.तत्पूर्वी कार्यक्रम सुरू होण्याआधी त्यांनी घेतलेल्या कार्यक्रम ाचे समाधान व्यक्त करत असे कार्यक्रम आपल्या हिंदू संस्कृती जपत चैत्र शुद्ध पाडवा ला ही असे कार्यक्रम घेण्याची त्यांनी सांगत हनुमान चालीसा चे महत्व विषद केले.या वेळी त्यांच्या सोबत जनेश्वर आश्रम चे प्रमुख ज्ञानेश्वर माऊली यांची ही उपस्थिती लाभली होती.या वेळी माऊली यांनी सुरू केलेल्या या कार्याचा उलेख करत असे कार्यक्रम होणे गरजेचे असल्याचे सांगितले. सोबत शुभेच्छा ही दिल्या.या वेळी महिला पुरुष मोठ्या संख्येने हजर होते. महेश गिरी महाराज यांनी पुढे बोलता वेळी सांगितले की नामस्मरण केल्याने येणारे संकट कमी होतात यांची कित्येक उदाहरन असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला राम भक्त राधा कृष्ण फेरी मंडळ सदस्य महिला पुरुष बाल गोपाल यांची उपस्थिती होती. संगीतमय हनुमान चालीसा मध्ये चाललेल्या कार्यक्रमात १२०० शे हनुमान चालीसा चे पठण झाल्याची माहिती अलकेश सोमाणी, कल्पेश सोमाणी यांना दिली.

# शिवसेना दिनदर्शिकेचे आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते विमोचन



**जालना । प्रतिनिधी -** शिवसेना उपनेते, आ. अर्जुनराव खोतकर यांचा वाढदिवस आणि नववर्षाचे औचित्य साधून इंजि. शरद ढाकणे यांनी संपादित केलेल्या शिवसेना दिनदर्शिकेचे बुधवारी ( ता. ०१) आ. अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते थाटात विमोचन करण्यात आले.

दर्शना निवासस्थानासमोर आयोजित सत्कार सोहळ्यात विमोचन प्रसंगी युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, पंडितराव भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे ,शहरप्रमुख विष्णू पाचफुले, राहुल हिवराळे, निलेश शिंदे ,स्वप्नील हिवराळे, आकाश जगताप,शुभम टेकाळे, शिवा कोरे ,सौरभ भिसे, नितीन कायांदे आदींची उपस्थिती होती. मागील चार वर्षांपासून इंजि. शरद ढाकणे यांनी माहितीपूर्ण उपयुक्त दिनदर्शिकेचा सुरू केलेल्या उपक्रमाचे आ. अर्जुनराव खोतकर यांनी कौतुक केले.

# जालन्यात ड्रिंक आणि ड्राईव्ह विरोधात पोलिसांची तपासणी मोहीमेत ३२ मद्यपी चालकांवर दंडात्मक कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** ड्रिंक अँड ड्राईव्ह विरोधात पोलिसांनी तपासणी मोहीम हाती घेतलीय. यात ३२ मद्यपी चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आलीय. थर्टी फर्स्ट आणि नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर जालन्यात ठीक ठिकाणी नाकेबंदी करून वाहतूक शाखा, उपप्रादेशिक परिवहन कार्यालय आणि जालना पोलिसांकडून वाहन चालकांची तपासणी करण्यात आली. यात मद्यपान करून वाहन चालवणाऱ्यांवर पोलिसांमार्फत दंडात्मक कारवाई केली गेलीय. या तपासणीत ३२ वाहनचालक मद्यपान करून वाहन



चालवताना आढळून आलेत. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आल्याची माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी आज दिनांक एक बुधवार रोजी दोन वाजेच्या सुमारास उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालयात दिली.

## चंदनझिरा पोलिसांची कारवाईत वाहन चालकांकडून १६ हजार रुपयाचा दंड वसूल

ड्रिंक आणि ड्राईव्ह विरोधात चंदनझिरा पोलिसांनी कारवाई केलीय. कारवाई दरम्यान १७ मोटार वेहिकल केसेस करण्यात आल्या आहेत. अशी माहिती प्रशिक्षणार्थी पोलीस उपाधीक्षक करिष्मा चौधरी यांनी दिलीये. थर्टी फर्स्ट आणि नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर चंदनझिरा पोलिसांनी रात्री ९ ते पहाटे ३ वाजे पर्यंत ऑल आऊट ऑपरेशन राबविले. यात १७ मोटार वेहिकल केसेस करण्यात आल्या असून वाहन चालकांकडून १६ हजार रुपयाचा दंड वसूल करण्यात आलाय. असल्याची माहिती करिश्मा चोधरी, प्रशिक्षणार्थी पोलिस उपअधीक्षक, जालना यांनी दिली

### जाफराबाद तहसीलदारांची कारवाई

# डावरगाव जवळ वाळूचा ट्रॅक्टर पकडला



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** इथून जवळच असलेल्या डावरगाव देवी जवळ जाफराबाद तालुक्याच्या तहसीलदार डॉक्टर सारिका भगत यांनी अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला. सध्या जाफराबाद तालुक्याच्या तहसीलदार डॉक्टर सारिका भगत यांनी अवैध वाहतुकीच्या विरोधामध्ये मोहीम उघडलेली आहे. आणि विविध पदके तयार केलेली आहेत. डॉक्टर सारिका भगत यांच्या नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली ही पथके कार्यरत असून, कार्य करीत आहेत. अशाच एका कारवाईमध्ये टेंभुर्णी येथून जवळच असलेल्या डावरगाव देवी मार्गावर अवैध वाहतूक वाळूचा ट्रॅक्टर पकडला असून तो पोलीस स्टेशन टेंभुर्णी येथे जमा केलेला आहे. या कारवाईसाठी त्यांच्यासोबत, टेंभुर्णी तलाठी सजा चे तलाठी राम धनेश, तलाठी विशाल दळवी, तलाठी साळवे, भगवान इंगळे, राजू खांडेभराड, पोलीस कर्मचारी धोंडगे साहेब, ठाकरे साहेब, आदींचे पथक कार्यरत होतं.

# जालना जिल्ह्यात मोसंबी बागांवर मंगू रोगाचा प्रादुर्भाव

## जिल्ह्यातील मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना बसतोय ढगाळ वातावरणाचा फटका

**बदनापूर । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यात मोसंबी बागांवर मंगू रोगाचा प्रादुर्भाव जाणवत आहे. ढगाळ वातावरणाम ुळे मोसंबी बागांवर रोगाचा प्रादुर्भाव झालाय. यामुळे जिल्ह्यातील मोसंबी उत्पादक शेतकरी चिंतेत पडले आहेत. मात्र, बदनापूर येथील म ोसंबी संशोधन केंद्राकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन किंवा रोगाचे व्यवस्थापन याबाबत माहिती देण्यात येत नाहीये. त्यामुळे यावर स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं नाराजी व्यक्त केलीय. बदनापूर येथील मोसंबी संशोधन केंद्राच्या



नाकर्तेपणा मुळे शेतकऱ्यांवर मोसंबी बागांवर कुऱ्हाड चालवण्याची वेळ आलीय अशी प्रतिक्रिया स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष सुरेश काळे यांनी दिली.

# हिमाचल प्रदेशाच्या CSIR-IHBT मध्ये इलेक्ट्रोहोमिओपॅथी औषधांवर वैज्ञानिक कार्यक्रम संपन्न

## मराठवाडातील जालना जिल्ह्याचे डॉ. अंबेकर संम्मिलित

**परतूर । प्रतिनिधी -** पालमपूर, हिमाचल प्रदेश येथे दिनाक १७ ते १९ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रधान शास्त्रज्ञ डॉ. व्ही.के. अग्निहोत्री, यांच्या समन्वय आणि मार्गदर्शनाखाली गुणवत्ता नियंत्रण, मानकीकरण आणि इलेक्ट्रोहोमिओपॅथिक औषधांचा वनस्पति अभ्यास या विषयावर तीन दिवसांचा भारताचा चौथा नाविन्यपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन उड्खठ-खक्द्दढ चे संचालक आदरणीय डॉ. एस.के. यादव यांनी केले. प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.व्ही.के. अग्निहोत्री यांचे अनालिटीकल वर्क, प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. योगेंद्र एस. पडवड यांचे इन-विट्रो, इन-व्हिव्हो, टॉक्सिसिटी आणि सेफ्टी अभ्यास, प्रधान शास्त्रज्ञ डॉ. आशिष वरघाट यांचे सहाय्यक पीएचडी अभ्यासक आशिष कुमार यांचे हायड्रोपोनिक आणि एरोपोनिक तंत्रज्ञान, प्रमुख शास्त्रज्ञ सरिता मॅडम यांचे किण्वन तंत्रज्ञान,तसेच श्री राम कुमार यांचं ए.ए.एस., प्रमुख शास्त्रज्ञ डॉ.अमित चावला यांनी पश्चिम हिम ालयात आढडणाऱ्या इलेक्ट्रो होमि ओपॅथी वनस्पती आणि अभ्यासाबाबत, डॉ.ओमप्रकाश यांनी वनस्पती ओळख कशी करू शकता असे विविध व्याख्यान व प्रशिक्षण देण्यात आले व त्याचे म हत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे समन्वयक झारखंड येथील डॉ.एच.के. झा यांचा हस्ते संचालक डॉ. एस. के. यादव आणि डॉ.अमित चावला , महाराष्ट्रातील डॉ. विशाल आर.पालीवाल यांचा हस्ते प्रम ुख शास्त्रज्ञ डॉ.योगेंद्र पडवाड, बिहारचे डॉ.राकेश मोहन यांचा हस्ते डॉ.व्ही. के.अग्निहोत्री यांचा, म.प्र.च्या श्रीमती बागुल यांच्या हस्ते शास्त्रज्ञ डॉ.सरिता यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. भारतातील विविध राज्यांतील इलेक्ट्रो होमिओपॅथी चिकित्सकानी या कार्यक्रमात प्रशिक्षण घेतले. हरियाणातील डॉ. एस. एस. यादव, बिहारचे डॉ.मनिषकुमार मिश्रा, डॉ.अमरदीप सिंग, डॉ.पंखुरी आर्य, मध्य प्रदेशाचे डॉ.मुकेश बागुल, म हाराष्ट्राचे डॉ.सुधीर आंबेकर, डॉ. एन. डी. पोलवार, टी. तेलंगणाचे श्री हरि सहभागी झाले होते. कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर विविध राज्यातील सर्व इलेक्ट्रो होमिओपॅथिक चिकित्सकांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. सर्व इलेक्ट्रोहोमिओपॅथी चिकित्सकांच्या वतीने डॉ. विशाल आर. पालीवाल यांनी आभार व्यक्त केले.




# वादग्रस्त व्हिडीओ अपलोड करणारा सायबरच्या ताब्यात

**मुंबई -** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वादग्रस्त व्हिडिओ सोशल मीडियावर अपलोड केल्याप्रकरणी महाराष्ट्र सायबर सेलने वरद तुकाराम कणकी या संशयिताला ताब्यात घेतले आहे. याचबरोबर सायबर सेलला आणखी एक संशयित पद्माकर आंबोळकर याची ओळख पटली असून, त्यालाही चौकशीसाठी बोलावण्यात आले आहे. हे दोन्ही संशयित मुंबईतील वरळी भागातील आहेत. सायबर सेल त्यांची राजकीय पार्श्वभूमी आणि इतर संभाव्य संशयितांची चौकशी करत आहे. दरम्यान या प्रकरणात आधीच एफआयआर दाखल करण्यात आला आहे.

# जाज्वल्य शिक्षण महर्षी दादासाहेब म्हस्के

स्वातंत्र्य,समता आणि सामाजिक न्यायावर आधारित बहुजन समाजातील तळागाळातील मुला-मुलींना शिक्षणाची व्यवस्था निर्माण करावी अशी धारणा उराशी बाळगणारे मराठवाड्यातील एकमेव शिक्षण महर्षी मा.दादासाहेब म्हस्के,म्हणून त्यांनी कसल्याही आव्हाणांना न डगमगता शिक्षणक्षेत्राचा लढा उभा केला.एकाकीपणे लढा लढतच राहुण सिल्लोड शिक्षण संस्थेची स्थापना ०३ सप्टेंबर १९८२ रोजी औरंगाबाद येथील हडको एन-११ या परिसरात स्थापन केली.

बहुजन समाजातील तळागाळातील मुला- म ुलींना प्राथमिक शिक्षणापासून ते पीएच-डी, रिसर्च पर्यंत चे शिक्षण मिळावे हि इच्छा दादासाहेबांची होती.व ती पूर्ण करण्यासाठी अविरतपणे आपला संघर्ष तेवतच ठेऊन आज मराठवाड्यातील गोर, गरीब मुलांना उच्च शिक्षणाची सोय व्हावी म्हणून जालना जिल्ह्यातील जाफराबाद या ठिकाणी सिद्धार्थ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना १९९१ साली करुन जालना जिल्ह्यातील अतिषय मागास असलेल्या तालुक्यातील मुलांना उच्च शिक्षणाची सोय निर्माण केली.ग्रामीण भागातीलच नव्हे तर विदर्भ,मराठवाडा व अन्य प्रांतातील अर्थी क दृष्ट्या मागासलेल्या मुलांना नाममात्र १०० रुपये प्रवेश फी घेऊन शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारे मराठवाड्यातीलच नव्हे तर महाराष्ट्रातील एकमेव शिक्षण महर्षी होत.

महाराष्ट्रावर सुलतांनी व आस्मांनी संकट आली,अशा काळात ही दादासाहेबांनी कोल्हापूर येथिल पूर ग्रस्तांना लाखो रुपये खर्चून अन्न व औषधी वाटप केली.एवढेच नाही तर कोरोना काळात ही जाफराबाद तालुक्यातील गावा गावात, हाजारो गोर गरीब कुटुंबाना अन्नाची , कपड्यांची,व औषधांची मदत करणारे दादासाहेब म्हस्के, म्हणूनच एक जाज्वल्य शिक्षण महर्षी म्हणून त्यांची ख्याती आहे. अशा शैक्षणिक कार्यासोबतच, सामाजिक धार्मिक कार्यात

अग्रेसर राहुण समाजातील सर्व घटकांना साम ावून घेण्यासाठी सतत मदतीचा हात पुढे करत असतात. दादासाहेबांच्या या सर्वांगपूर्ण कार्याकरिता या वर्षी दुबई येथे संपन्न झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय साहित्य संमेलनात दादांना आदर्श संस्थापक म्हणून पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं.

मला दादासाहेबांच्या विचारांची पातळी शोधता-शोधता नतमस्तक होऊन बुद्धाच्या मानवी कल्याणाचा मार्ग आठवतो.तो म्हणजे, गौतम बुद्धाचा धम्म, विचार ,माणसाच्या दुखःमागिल मुळ प्रवृत्तीचा शोध घेणारा आणि दु:खाला म ानवी जीवनातून हद्पार करणारा आहे.या धम्म ाची मांडणीही शास्त्रशुद्ध बुद्धीप्रामाण्य वादावर आधारलेली आहे.हा धम्म माणसाच्या मृत्यू नंतर त्याचे काय होईल या काल्पनिक तर्का विषयी बोलत नाही.माणसाला जिवंतपणी सुखी कसे करता येईल याचा रितसर आराखडा मांडतो.मानवी सुखाच्या या आराखड्यातूनच बौद्ध धम्म आकारास आला आहे.हेच त्याचे वेगळेपण आहे.बुध्दविचारात व्यक्ति विकासाला महत्व आहेच,पण तो विकास सामाजिक बांधिलकी व बंधुत्वाशी निगडित आहे. व्यक्ति विकास करतांना समाजहित जपणे अनिवार्य असल्याचे गौतम बुद्धांनी नमुद केले आहे.

बुद्धाच्या या विचारावर शिक्षण महर्षी मा.दादासाहेब म्हस्के यांनी आपल्या संस्थेची संपूर्ण विचारधारा अविरतपणे सुरू ठेवली असून शिक्षण क्षेत्राचा विकास करुण ग्रामीण भागातील तळागाळातील,दिन-दलित, शोषित, पिडित, कष्टकरी, शेतमजूर, कामगार, अर्थीक दृष्ट्या मागासलेल्या मुलांना व मुलिंना नाममात्र शुल्क (१०० रुपये) घेऊन गोरगरिबांच्या दारात शिक्षणाची ज्ञानगंगा घरोघरी घेऊन जाण्याची जणू क्रांतीच केली.आजच्या परिस्थितीत महाराष्ट्रातील एकमेव अल्पसंख्याक दर्जा असलेली संस्था,... ज्यांना कसलाही राजकीय वरदहस्त नाही,..ना खासदार ना आमदार,ना मंत्री .ना कुणाचा आर्थिक आधार. एवढं महत्त कार्य करणं सोपं नसेलच,पण म्हणतात...न..जो बाबासाहेब आंबेडकरांच्या व भगवान बुद्धाच्या विचारांची व आदर्शाची मूल्यं जतन करून ती रोजच्या दैनंदिन जीवनात अविरतपणे आत्मसात करतो त्यांची प्रगतीच होईल.



दादासाहेबांनी संस्थेची स्थापना करत असतांना घरादाराचा, आपल्या कुटुंबाचा ,विचार न करता अविरत समाजासाठी व सम ाजातील तळागाळातील लोकांना व त्यांच्या कुटुंबाचा माझ्या कडून व माझ्या शिक्षण संस्थेच्या वतीनं कसा विकास होईल हेच दिव्य स्वप्नं रात्रंदिवस पाहिलं.त्या भगवान बुद्धाच्या व डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा पाईक कसा मागे राहीलड्दादांना सम ाजातील सर्वच स्तरातून आशिर्वाद रुपी सहकार्यानेच आज येवढा मोठा शिक्षणसंस्थेचा डोलारा उभारला आहे.

आज दादासाहेबांनी उभारलेल्या शिक्षण संस्थेची भरभराट ही वैदिक धर्मातील कर्मकांड आणि अम ानवी विषमतेविरुध बंड करून सामाजिक न्याय -स्वातंत्र्य-समता आणि बंधुत्वाचा विचार देणारा तथागत भगवान गौतम बुद्धाचा बौद्ध धम्म, छत्रपती शिवरायांचे रयतेचे राज्य निर्माण करण्याची दूर्दम्य इच्छा शक्ती, महात्मा ज्योतीबा फुल्यांची सामाजिक क्रांतीची प्रेरणा, राजश्री शाहू महाराजांची सामाजिक न्यायाची भूमिका, आणि नवा भारत,नवा समाज घडविण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या भारतीय संविधानाची उपासना या शिवाय भारतीयांची प्रगती नाही.....या महानायकांच्या विचारावरच सिल्लोड शिक्षण संस्थेचे सन्माननीय संस्थापक अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के यांचा दृढ विश्वास आहे.

दादासाहेबांनी शैक्षणिक दर्जाची जाणीव,विकास कार्याचा झपाटा ,कला संस्कृतीशी नातं, गुणवत्तेची दखल,विकासाचे ध्येय बाळगून वाटचाल,व विकासा करिता अनेक उपक्रम राबविले आहेत.

अशा शिक्षण महर्षी मा.दादासाहेबांना दीर्घायुष्याच्या हार्दिक हार्दिक मन:पूर्वक शुभेच्छा..व सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या दादासाहेबांचे कार्य आणखी बहरत राहो अशी मनोकांमना !

**-प्राध्यापक अनिल वैद्य,**
**सिद्धार्थ महाविद्यालय जाफराबाद**

दर्पण दिन २०२५ निमित्त

# पत्रकार सन्मान सोहळा व आमदारांचा जाहीर सत्कार

**पीसीएम जिल्हा रत्न पुरस्कार**
ज्येष्ठ व युवा पत्रकार सन्मान पुरस्कार
**पत्रकार-सोशल पुरस्कार**

पत्रकारांची जिल्हास्तरीय बॉक्स क्रिकेट लिग स्पर्धा
जिल्ह्यातील सर्व पत्रकारांचा सत्कार
पेपर वितरीत करणाऱ्या गरीब मुलांस सायकल भेट

## जिल्ह्यातील पाचही नवनिर्वाचित आमदार महोदयांचा जाहीर सत्कार

**मा. श्री. अर्जुनरावजी खोतकर**
आमदार, जालना विधानसभा मतदार संघ

**मा. श्री. बबनरावजी लोणीकर**
आमदार, परतूर विधानसभा मतदार संघ

**मा. श्री. संतोष पा. दानवे**
आमदार, भोकरदन विधानसभा मतदार संघ

**मा. श्री. नारायणजी कुचे**
आमदार, बदनापूर विधानसभा मतदार संघ

**मा. श्री. हिकमतदादा उढाण**
आमदार, घनसावंगी विधानसभा मतदार संघ

## भारती लॉन्स, भोकरदन नाका, राजुर रोड, जालना.

**सोमवार, दि. ६ जानेवारी २०२५ सकाळी ११ वाजता**

विनीत
दीपक शेळके, दर्पण जैन, गणेश काबरा,
नितेश महाजन, आमेर खान, शेख चांद पी.जे., नरेंद्र जौगड, बाबुजी तिवारी, सय्यद रफिक, सुनील भारती, प्रा. दत्ता देशमुख,
नरेंद्र जौगड, आशिष तिवारी, दिनेश नंद, चैतन बजाज, शेख अशफाक, सौ. करुणा मौरे, शेख नबी सिपोराकर

**आयोजक : प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हा**

### उहापोह ...

राजकारणाचे युध्दां
कधी आवश्यक तह
विचारपूर्वक संपूर्ण
रे द्यावा लागतो शह
डोळ्यांसमोर वेदना
शर पंजरी पितामह
समोर मित्र उभे करे
न कळत दे काटशह
वनवासात चक्रवर्ती
आंधळा बनतो मोह
पाठिराखा मानलेला
करू शके कधी द्रोह
सिंहासनी आरूढला
प्रांक्तन करी अवरोह
एकसंधी अशी मिळे
आकाशा करे आरोह
सर्व शक्तीमान कुणी
अशक्त करी व्यामोह
गिळे धैर्याचीं आविर्ते
विभ्रम मासे सम्मोह
सुवर्णही फिके पडते
युध्द जिंकविते लोह
चाणाक्ष निती समोर
निष्प्रभ पडे जिलोह
कसे जिंकलो हरलो
करतबसावे उहापोह
कुणा न दिसला तळ
युद्धकला ४थांग डोह

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.